
नाशिक विभागातील विविधक्षेत्रांतील सावित्रींच्या लेकींचा त्यांच्या भरीव कामगिरीबद्दल

# कृतज्ञता सोहळा






अहवाल

१८

ऑक्टोबर२०२२



## कार्यक्रमाची रूपरेषा

- **अध्यक्ष** :डॉ. प्रकाश देशमुख
- **प्रमुख पाहुणे :** ॲड. दीपाली खेडकर
- **प्रमुखउपस्थिती**: डॉ.जयदीप निकम
- **प्रास्ताविक** :डॉ. कामळस्कर चेतना
- **सूत्रसंचालन :** माधुरी खर्जुले
- **पाहुण्यांचे परिचय व सन्मानपत्र वाचन :** प्रमोद पवार आणि माधुरी देशपांडे
- **समारोप**: श्री. दत्ता पाटील

## वेळेचे नियोजन- ११.२० ते १.२५

**१. सूत्रसंचालन** :११.२० ते११.२५
(प्रतिमेला पुष्प अर्पण)

**२. कार्यक्रमाचे प्रास्ताविक :**११.२५ ते११.३५

**३. प्रमुख पाहुणे ओळख आणि स्वागत :**११.३५ ते११.४०

**४. जयदीप निकम सरांचे मनोगत :** ११.४० ते११.४५

**५. मानपत्र वितरण व मान्यवरांचे मनोगत:**११.४५ ते१२.५०

**६. प्रमुख पाहुण्यांचे मनोगत :**१२.५० ते १.०५

**७. अध्यक्षांचे मनोगत :**१.०५ ते १.२०

**८. समारोप / आभार** :१.२० ते १.२५

# कार्यक्रमाचे परिपत्रक

## यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

अंतर्गत संज्ञापन पत्र

जा.क्र.- यचममुवि /साफुअ/2022/19

दिनांक : १४/१०/२०२२

### परिपत्रक

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठातील सावित्रीबाई फुले अध्यासनाच्या वतीने समर्पित भावनेने समाजाची सेवा करीत असलेल्या विविध क्षेत्रातील महिलांचा कृतज्ञता सोहळा आयोजित केला आहे. या सोहळ्यात नाशिक विभागातील विविध क्षेत्रात सक्रीय सहभागासह भरीव कार्य करीत असलेल्या महिलांना त्यांच्या योगदानाप्रीत्यर्थ सन्मानित करण्यात येणार आहे.

या कार्यक्रमास विद्यापीठातील सर्व संचालक, नियमित शिक्षक, शिक्षकेतर अधिकारी/कर्मचारी, करारावरील शिक्षक/अधिकारी/कर्मचारी, दैनंदिन वेतनावरील कर्मचारी, बीबीए/ आयटीआय/ पी.एच.डी. विद्यार्थी तसेच स्वच्छता/ साफ सफाई विभागातील कर्मचारी आणि शेतमजूर महिलावर्ग व इतर सर्वांनी उपस्थित राहावे.

**दिनांक :** १८ ऑक्टोबर, २०२२.

**स्थळ :** ऑडीटोरियम (Auditorium), शैक्षणिक इमारत, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक.

**वेळ :** सकाळी ११.२० वा. (१० मिनिटे आगोदर कार्यक्रमासाठी स्थानापन्न व्हावे)

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक-४२२ २२२

कुलसचिव (प्र.)

प्रत : माहितीस्तव मा. कुलगुरू यांचे कार्यालय

माहितीस्तव: मा. कुलसचिव यांचे कार्यालय

प्रत : सर्व विद्याशाखा, विभाग, केंद्र व कक्ष प्रमुख यांनी सदरचे परिपत्रक आपल्या अधिनस्त सर्व संबंधितांच्या निदर्शनास आणून द्यावे.

## कृतज्ञता सोहळा

आपल्या देशातील सामाजिक क्रांतीची सुरुवातही खऱ्याअर्थाने महात्मा ज्योतिबा फुले आणि क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांनी सुरू केलेल्या शैक्षणिक चळवळीपासून झाली. याच सावित्रीबाईंच्या नावानं यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाने काही वर्षांपूर्वी एका अध्यासनाची सुरुवात केली. एक सामाजिक संवादाचा सेतू निर्माण करण्याचा प्रयत्न या अध्यासनामार्फत केला जातो. याच संवादाचा एक भाग म्हणून, हा संवाद अधिक दृढ व घट्ट करण्याच्या दृष्टीने सावित्रीबाई फुले अध्यासनाने अनोखा कृतज्ञता सोहळा साकारण्याचे प्रस्तुत केले. क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या विचारांची कास धरून समर्पित भावनेने समाजाची सेवा करणाऱ्या नाशिक विभागातील विविध क्षेत्रांतील महिलांचा अर्थात सावित्रींच्या लेकींचा, त्यांच्या भरीव कामगिरीबद्दल कृतज्ञता सोहळा, अध्यासनाच्या वतीने दिनांक १८ ऑक्टोबर, २०२२ रोजी सकाळी ११.२० वाजता, ऑडिटोरियम शैक्षणिक इमारत, मुक्त विद्यापीठ येथे आयोजित करण्यात आला.

या कृतज्ञता सोहळात आपल्या कर्तबगारीतून आणि सेवाभावी वृत्तीने कार्यरत असलेल्या क्षेत्रात भरीव कामगिरी करून नावलौकिक वाढण्यास मदत केल्याबद्दल मा. लीना बनसोड (प्रशासकीय क्षेत्र), विद्या देशपांडे (सांस्कृतिक व कलाक्षेत्र), डॉ. मृदुला बेळे (शैक्षणिक क्षेत्र), अश्विनी देवरे (क्रीडाक्षेत्र), अपूर्वा जाखडी (विज्ञानक्षेत्र), गायत्री कुलकर्णी (पत्रकारिता क्षेत्र), गोदावरी पवार (सामाजिक क्षेत्र), डॉ. विद्या सुर्वे-बोरसे (साहित्य क्षेत्र), विजया देठे (वैद्यकीय क्षेत्र), शामला चव्हाण (कृषी व सामाजिक चळवळ क्षेत्र), पी.आय. सारिका अहिरराव (पोलीस क्षेत्र), या सर्व सावित्रींच्या लेकींना सावित्रीबाई फुले अध्यासनाच्या वतीने शाल, मानचिन्ह, पुस्तक, पेरूचे रोप आणि सन्मानपत्र देऊन सन्मानित करण्यात आले.

या सोहळ्यास प्रमुख पाहुण्या म्हणून दीपन्वय फाऊन्डेशनच्या अध्यक्षा श्रीमती दीपाली खेडकर मॅडम यांना आमंत्रित करण्यात आले होते. क्रांतिज्योती सावित्रीबाईंच्या विचारांची कास धरून त्यांचे सामाजिक चळवळीतील कार्य, गरीब निराधार महिलांसाठी रोजगार निर्मितीच्या कार्यशाळा, करोना काळातील विधवा महिलांचे पुनर्वसनाचे कार्य, त्यांना प्रशिक्षण देऊन स्वयंपूर्ण बनविण्याचे प्रयत्न इत्यादी कार्याची माहिती त्यांच्या परिचयातून आणि मनोगतातून झाली. यावेळी व्यासपीठावर मा. कुलसचिव डॉ. प्रकाश देशमुख, विद्यापीठाच्या व्यवस्थापन मंडळाचे सदस्य आणि निरंतर शिक्षण विद्याशाखा व आरोग्य विज्ञान विद्याशाखेचे संचालक डॉ. जयदीप निकम सर, दीपाली खेडकर मॅडम, मा. लीना बनसोड मॅडम आणि अध्यासनाच्या प्रमुख डॉ. चेतना कामळस्कर उपस्थित होते.

सर्व मान्यवर सत्कारार्थींनी आपले मनोगत व्यक्त करत क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांचे विचार आणि कार्याचा प्रसार करण्यासाठी तसेच ऋणानुबंध अधिक व्यापक करण्यासाठी नक्कीच प्रयत्नशील असू असे आश्वासित केले. व्यवस्थापन मंडळाचे सदस्य डॉ. जयदीप निकम आणि मा. कुलसचिव डॉ. प्रकाश देशमुख यांनी विद्यापीठातील शैक्षणिक उपक्रमांचा आढावा घेऊन विचार मांडले. सावित्रीबाईंच्या कार्याची ज्योत तेवत ठेवत विविध क्षेत्रांत आपल्या कार्याने तळागाळातील सर्वसामान्याही प्रोत्साहित आणि समृद्ध करीत असल्याबद्दल सत्कारार्थींचे कौतुक केले व पुढील कार्यास शुभेच्या दिल्या.

अध्यासनाच्या प्रमुख डॉ. चेतना कामळस्कर यांनी क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या कार्यावर प्रकाश टाकत 'कृतज्ञता सोहळा' या कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले, तर माधुरी खर्जुल यांनी सूत्रसंचालन, प्रमोद पवार व माधुरी देशपांडे यांनी सन्मानपत्रांचे अभिवाचन आणि दत्ता पाटील यांनी आभार मानून कार्यक्रमास रंगत आणली.

हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मा. कुलसचिव डॉ. प्रकाश देशमुख यांचे वेळोवेळी मार्गदर्शन मिळाले. त्याचबरोबर प्रमोद पवार, माधुरी देशपांडे, माधुरी खर्जुल, कविता देव, अंजली ताजनपुरे, भावना भऊरकर, डॉ. दयाराम पवार, दत्ता पाटील, दयानंद हत्तीअम्बिरे, सचिन शिंदे तसेच ग्रंथनिर्मिती केंद्रातील सर्व सहकारी, विद्यार्थी सेवा विभागातील सर्व सहकारी, दृक-श्राव्य विभागातील सर्व सहकारी, कृषी विज्ञान केंद्रातील सहकारी यांच्या सहकार्यामुळे कार्यक्रम यशस्वी करता आला.

या कार्यक्रमासाठी सत्कारमुर्तींचे कुटुंबिय, विद्यापीठातील विविध विद्याशाखांचे संचालक, प्राध्यापक, शिक्षकेतर अधिकारी/कर्मचारी, करारावरील शिक्षक/अधिकारी/कर्मचारी, दैनंदिन वेतनावरील कर्मचारी, पी.एच.डी./बी.बी.ए./आय.टी.आय. विद्यार्थी तसेच स्वच्छता विभागातील कर्मचारी आणि शेत मजूर महिलावर्ग व इतर सर्व उपस्थित होते.

या कृतज्ञता सोहळा संदर्भातील कार्यक्रमाची रूपरेषा, वृत्तपत्रांतील प्रसिद्धी/लिंक, छायाचित्रे, उपस्थितांचे रेकॉर्डसोबत जोडली आहेत.

डॉ. चेतना कामळस्कर

प्रमुख, सावित्रीबाई फुले अध्यासन

# Krutadnyata Sohala

Our country's social revolution began with Mahatma Jyotiba Phule and Krantijyoti Savitribai Phule's educational movement. Yashwantrao Chavan Maharashtra Open University has also initiated a bridge of social dialogue for revolution by starting Savitribai Phule Adhyasan. As a part of this dialogue, Savitribai Phule Adhyasan has organized a unique gratitude ceremony, 'Krutadnyata Sohala' to strengthen and deepen it. On 18th October, 2022, at 11.20 am, in the Academic Building of this university, a gratitude ceremony was held on behalf of Adhyasan for the women of Nashik Division who served the society with a dedicated spirit, i.e., Savitri's followers from various fields, for their significant achievements.

In this felicitation ceremony, Hon. Leena Bansod (Administrative Sector), Mrs. Vidya Deshpande (Cultural and Art Sector), Dr. Mrudula Bele (Academic Sector), Ashwini Deore (Sports Sector), Ms. Apurva Jakhadi (Science Sector), Gayatri Kulkarni (Journalism Sector), Godavari Pawar (Social Sector), Dr. Vidya Surve-Borse (Literary Sector), Mrs. Vijaya Dethe (Medical Sector), Mrs. Shyamala Chavan (Agricultural and Social Movement Sector), PI Sarika Ahirrao (Police Sector), all these Savitri's Lekkis were honored for their contributions to the reputation of the field in which they work, with a shawl, memento, book, guava plant, and a 'Sanman Patra (letter of honor)' on behalf of Savitribai Phule Adhyasan.

The President of Deepnavay Foundation's Ad Deepali Khedkar Madam was invited as the chief guest for this function. Her work in the social movement included supporting Krantijyoti Savitribai's ideas, organizing job creation workshops for poor and destitute women, doing rehabilitation work with widowed women during the COVID period, making them self-sufficient through training, and so on. On this occasion, Hon. Registrar Dr. Prakash Deshmukh, Member of the Board of Management and Director of the School of Continuing Education and the School of Health Science Dr. Jaydeep Nikam Sir, Deepali Khedkar Madam, Hon. Leena Bansod Madam, and the Head of Adhyasan, Dr. Chetana Kamlaskar, were present.

All of the recipients of the honor expressed their gratitude and promised to work hard to promote Krantijyoti Savitribai Phule's views and contributions as

well as deepen their social connections for the betterment. At this time, the university's board of management members, Dr. Jaydeep Nikam and Hon. Registrar Dr. Prakash Deshmukh, reviewed and presented their thoughts on the university's educational activities, praised the awardees for encouraging and enriching the common people at the grassroots level with their work in various fields while keeping the spark of Savitribai's work alive, and wished them good luck for their future work.

The head of Adhyasan, Dr. Chetana Kamlaskar in her introductory speech gave a brief overview of Krantijyoti Savitribai Phule's efforts and explained the motivation behind the planning of ‘Krutadnyata Sohala’ program. Madhuri Kharjul anchored the program, Pramod Pawar and Madhuri Deshpande read the "Sanman Patra" during the distribution of the "letter of honor", and Datta Patil proposed the vote of thanks.

We received timely guidance from Hon. Registrar Dr. Prakash Deshmukh to make this program successful. Along with this, Pramod Pawar, Madhuri Deshpande, Madhuri Kharjul, Kavita Dev, Anjali Tajanpure, Bhavna Bhaurkar, Dr. Dayaram Pawar, Datta Patil, Dayanand Hattiambire, and Sachin Shinde made special efforts to ensure the program's success. All the colleagues in the Print Production Center, the Student Services Division, the Audio-Visual Center, and the Krishi Vigyan Kendra were supported to make the program successful. The Director of Schools, Professors, Academic Coordinators, Non-Teaching Officers/Employees, Daily Wage Employees, Ph.D./BBA/ITI Students, as well as Sanitation/Cleaning Department Women, Farm workers Women, and all others, were present for this program.

This ‘Krutadnyata Sohala’ program report, along with the program schedule, press coverage, images, video link and attendance data, are all attached. The program photos were taken by Mr. Rajesh Barve, Assistant, PRO.

Dr. Chetana Kamlaskar
Head, Savitribai Phule Adhyasan

कार्यक्रमाच्या प्रमुख पाहुण्या व सामाजिक कार्यकर्त्या ॲड. दीपाली खेडकर, नाशिक यांचे स्वागत करताना अध्यासनाच्या प्रमुख डॉ. चेतना कामळस्कर, व्यवस्थापन मंडळाचे सदस्य डॉ. जयदीप निकम आणि मा. कुलसचिव डॉ. प्रकाश देशमुख आदी.










करोना काळातील विधवा महिलांची आसवं पुसून त्यांना एकत्र आणणे, प्रशिक्षणं देऊन स्वयंपूर्ण बनवणे यांसारखे सामाजिक कार्य करीत असलेल्या ॲड. दीपाली खेडकर या विद्यापीठाची एक विद्यार्थिनीसुद्धा आहे. विद्यापीठाच्या विद्यार्थीनीचे हे कार्य विद्यापीठासाठी कौतुकास्पद आणि अभिमानास्पद आहे. महिलांसाठी काम करताना सर्वसमावेशकता, हेतूंमधील स्पष्टता आणि सातत्य असल्यास तळागाळांतील घटकांपर्यंत आपले कार्य झिरपत जाऊन एक सामाजिक संवाद प्रस्थापित होऊ शकतो असे मत प्रमुख पाहुण्या म्हणून बोलत असताना त्यांनी व्यक्त केले.

व्यासपीठावरील मान्यवरांच्या उपस्थितीत **मा. लीना बनसोड - प्रशासकीय क्षेत्र (मुख्य कार्यकारी अधिकारी, जि. प. नाशिक)** यांना सन्मानपत्र, शाल, मानचिन्ह, पुस्तक आणि पेरूचे रोप देऊन सन्मानित करतानाचा क्षण....



सर्वोत्कृष्ट संस्थेसाठी कॉमनवेल्थ ऑफ लर्निंगच्या आंतरराष्ट्रीय गुणवत्ता पुरस्काराने दोन वेळा सन्मानित
मनुष्यबळ विकास मंत्रालय, नवी दिल्ली यांचे 'स्वच्छ कॅम्पस रँकिंग २०१९' मानांकन प्राप्त

**यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक**

(नॅक मानांकित 'अ' श्रेणी)

**सावित्रीबाई फुले अध्यासन**

ती ज्ञानाची जननी, ती प्रेमाची मूर्ती ।
ती त्यागाची महती, ती सेवेची कर्ती ।।
होऊ कशी उतराई, तुझी आजन्म मी ऋणी ।।।

क्रांतिज्योती सावित्रीबाईंनी स्त्री-शिक्षणापासून सुरुवात करून स्वत:ला वेगवेगळ्या समाजकार्यात झोकून दिले. समाजसेवा हे सांगण्याचे कार्य नसून ते अव्याहत आणि निर्मोहीपणे करण्याचे कार्य आहे. हा परिपाठ सावित्रीबाईंनी त्यांच्या समर्पणातून दाखवून दिला.

**।। कृतज्ञता सोहळा ।।**

**सन्मानपत्र**

**मा. श्रीमती लीना बनसोड - भा.प्र.से. - मुख्य कार्यकारी अधिकारी**

आपण भौतिकशास्त्र विषयात पदव्युत्तर पदवी प्राप्त केली आहे. महाराष्ट्र शासनातर्फे आपली हारवर्ड विद्यापीठ, केम्ब्रिज (अमेरिका) येथे पब्लिक ॲडमिनिस्ट्रेशन या पदव्युत्तर पदवीसाठी निवड करण्यात आली. आपण जानेवारी २0२0 मध्ये भारतीय प्रशासकीय सेवेत दाखल झाला. तत्पूर्वी आपण वेगवेगळ्या जिल्हा परिषदांमध्ये प्रथम श्रेणी अधिकारी म्हणून कार्य केले. नाशिक विभागात आपण राबविलेल्या 'स्वच्छ भारत' अभियानांतर्गत प्रकल्पासाठी नाशिक जिल्हा परिषदेला विशेष पुरस्कार प्राप्त झाला. आपण जिथे कार्यरत असता तिथे आपण केंद्र, राज्य शासनाचे उपक्रम उत्कृष्टरित्या राबविता. माझी वसुंधरा अभियान, यशवंत पंचायत राज अभियान अशा प्रकल्पांना वेळोवेळी पुरस्कारही प्राप्त झाले. कोविडच्या काळात आपण बचतगटांमार्फत मास्कची निर्मिती करून ६६८ महिलांना ४९.३७ लाखांचे उत्पन्न मिळवून दिले. तसेच आपण नागरिकांसाठी ई-साय क्लिनीक, क्लाऊज फिजिशियन सुरू केलेत. तसेच ७ आधुनिक रुग्णवाहिका सेवेत रुजू केल्या. शाळा बंद असल्याने गरीब विद्यार्थी मोबाईल तसेच लॅपटॉप, संगणक यांच्या अभावाने शिक्षणापासून दुरावत होते. आपण लोकसहभागातून अशा विद्यार्थ्यांसाठी ४0४१ मोबाईल संच, लॅपटॉप, संगणक उपलब्ध करून दिले व 'शाळा बंद पण शिक्षण सुरू' हे अभियानही उत्तमरित्या राबविले. आपल्या प्रशासकीय अधिकाराचा वापर आपण सेवाकार्यासाठी करत जनतेच्या मनात आदराचे स्थान निर्माण केले. आपले कार्य प्रभावशाली असून प्रेरणादायी आहे.

आपल्या या सेवाकार्याचा गौरव करताना यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या सावित्रीबाई फुले अध्यासनाला विशेष आनंद होत आहे. आपल्या या प्रशंसनीय कार्यासाठी आपणाला हे सन्मानपत्र प्रदान करण्यात येत आहे. यापुढील काळातही आपल्याकडून असेच सेवाकार्य घडावे यासाठी आपणाला अनेकानेक शुभेच्छा !

डॉ. चेतना कामळस्कर
प्रमुख, सावित्रीबाई फुले अध्यासन

प्रा. डॉ. प्रकाश देशमुख
कुलसचिव

प्रा. डॉ. पी. जी. पाटील
कुलगुरू







**सन्मानानंतरची मा. लीना बनसोड यांची प्रतिक्रिया -** प्रशासकीय सेवेत कार्य करणारे लोकसेवक हे स्टील फ्रेम असतात. ते दिसत नसतात, अदृश्य असतात. ज्याप्रमाणे इमारतीचे स्ट्रक्चर / कॉलम हे अदृश्य असतात पण ते इमारतीला बळकटी देतात. तेच काम प्रशासकीय सेवेतील लोकसेवक करत असतात. अशाप्रकारचे सन्मान काम करण्याची उर्मी देत असतात.

व्यासपीठावरील मान्यवरांच्या उपस्थितीत **श्रीमती अहिरराव सारिका - पोलीस दल (पी. आय., तालुका पोलीस स्टेशन, नाशिक)** यांना सन्मानपत्र, शाल, मानचिन्ह, पुस्तक आणि पेरूचे रोप देऊन सन्मानित करतानाचा क्षण....



सर्वोत्कृष्ट संस्थेसाठी कॉमनवेल्थ ऑफ लर्निंगच्या आंतरराष्ट्रीय गुणवत्ता पुरस्काराने दोन वेळा सन्मानित
मनुष्यबळ विकास मंत्रालय, नवी दिल्ली यांचे 'स्वच्छ कॅम्पस रँकिंग २०१९' मानांकन प्राप्त

**यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक**

(नॅक मानांकित 'अ' श्रेणी)

**सावित्रीबाई फुले अध्यासन**

ती ज्ञानाची जननी, ती प्रेमाची मूर्ती ।
ती त्यागाची महती, ती सेवेची कर्ती ।।
होऊ कशी उतराई, तुझी आजन्म मी ऋणी ।।।

क्रांतिज्योती सावित्रीबाईंनी स्त्री–शिक्षणापासून सुरुवात करून स्वत:ला वेगवेगळ्या समाजकार्यात झोकून दिले. समाजसेवा हे सांगण्याचे कार्य नसून ते अव्याहत आणि निर्मोहीपणे करण्याचे कार्य आहे. हा परिपाठ सावित्रीबाईंनी त्यांच्या समर्पणातून दाखवून दिला.

**।। कृतज्ञता सोहळा ।।**

**सन्मानपत्र**

**श्रीमती सारिका अहिरराव – पोलीस निरीक्षक**

आपण आपले २००५ साली महाराष्ट्र पोलीस अकॅडमीतून पोलीस उपनिरीक्षक म्हणून प्रशिक्षण पूर्ण करून पोलिस दलात रूजू झालात. 'सदरक्षणाय खलनिग्रहणाय' या ब्रीदाशी प्रामाणिक राहून महाराष्ट्र पोलीस दलाची प्रतिष्ठा आणि कर्तव्याशी एकनिष्ठ राहत कायदा, सुव्यवस्था व शांतता प्रस्थापित करण्यास आपले महत्तवपूर्ण योगदान देत आहात. आपण आपल्या नाशिक येथील क्राईम ब्रँचच्या कार्यकाळात सुमारे ३५ गुन्ह्यांचा शोध लावला. अँटी करप्शन ब्युरो, नाशिक येथील कार्यकाळात सापळे रचून सुमारे ७०च्या वर गुन्हे यशस्वीरित्या उघडकीस आणले. त्याचबरोबर नाशिक येथे साखळीचोरीत सक्रिय असलेल्या टोळीच्या प्रमुखास मध्यप्रदेशातून अटक केली. त्याच्या साथीदारांना नाशिक येथून अटक केली. यांतून २० फिर्यादींना त्यांचे सोने परत मिळवून दिलेत. अल्पवयीन मुलींना संमोहित करून धाक दाखवत चोरी करण्यास भाग पाडणाऱ्या भोंदूबाबांना सापळा रचून अटक गुन्हा उघडकीस आणला. घरफोडी केलेल्या, मोटरसायकल चोरी केलेल्या अनेक गुन्ह्यांचा तपास लावला. म्हणून आपण केलेल्या प्रशंसनीय कार्याबद्दल आपणांस १५०हून अधिक पदकांनी सन्मानित केले आहे. आपण राज्यस्तरीय शूटिंग स्पर्धेत सुवर्णपदक पटकावून खेळातही आपल्या व्यक्तिमत्त्वाचा ठसा उमटवला. आपले कार्य उत्तुंग आणि प्रशंसनीय आहे.

आपल्या पोलीस दलातील या कार्याचा गौरव करताना यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या सावित्रीबाई फुले अध्यासनाला विशेष आनंद होत आहे. आपल्या या प्रशंसनीय कार्यासाठी आपणाला हे सन्मानपत्र प्रदान करण्यात येत आहे. यापुढील काळातही आपल्याकडून असेच भरीव सेवाकार्य घडावे यासाठी आपणाला अनेकानेक शुभेच्छा !

| | | |
|---|---|---|
| डॉ. चेतना कामळस्कर<br>प्रमुख, सावित्रीबाई फुले अध्यासन | प्रा. डॉ. प्रकाश देशमुख<br>कुलसचिव | प्रा. डॉ. पी. जी. पाटील<br>कुलगुरू |








**सन्मानानंतरची मा. सारिका अहिरराव यांची प्रतिक्रिया -** आम्ही जे कार्य करतो ते आमचे कर्तव्यच असते. पण कौतुकाची थाप अधिक जोमाने कार्य करण्यास प्रवृत्त करते. सन्मानाने जबाबदारी वाढवली आहे. हा सन्मान म्हणजे माहेरचा सन्मान आहे.

व्यासपीठावरील मान्यवरांच्या उपस्थितीत **सौ. विद्या देशपांडे - कला आणि सांस्कृतिक क्षेत्र (नृत्यालंकार, नाशिक)** यांना सन्मानपत्र, शाल, मानचिन्ह, पुस्तक आणि पेरूचे रोप देऊन सन्मानित करतानाचा क्षण....


सर्वोत्कृष्ट संस्थेसाठी कॉमनवेल्थ ऑफ लर्निंगच्या आंतरराष्ट्रीय गुणवत्ता पुरस्काराने दोन वेळा सन्मानित
मनुष्यबळ विकास मंत्रालय, नवी दिल्ली यांचे 'स्वच्छ कॅम्पस रँकिंग २०१९' मानांकन प्राप्त
यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक
(नॅक मानांकित 'अ' श्रेणी)

सावित्रीबाई फुले अध्यासन

ती ज्ञानाची जननी, ती प्रेमाची मूर्ती ।
ती त्यागाची महती, ती सेवेची कर्ती ।।
होऊ कशी उतराई, तुझी आजन्म मी ऋणी ।।।

क्रांतिज्योती सावित्रीबाईंनी स्त्री-शिक्षणापासून सुरुवात करून स्वत:ला वेगवेगळ्या समाजकार्यात झोकून दिले. समाजसेवा हे सांगण्याचे कार्य नसून ते अव्याहत आणि निर्मोहीपणे करण्याचे कार्य आहे. हा परिपाठ सावित्रीबाईंनी त्यांच्या समर्पणातून दाखवून दिला.

।। कृतज्ञता सोहळा ।।

सन्मानपत्र

विद्या देशपांडे - कथ्थक नृत्यालंकार

कला ही जीवनाच्या आनंदाचा अविभाज्य भाग आहे. कलेच्या सादरीकरणातून स्वत:सोबत आपण इतरांनाही अत्यानंद देत असतो. आपण नृत्यकलेच्या माध्यमातून अनेक शिष्यांना नृत्याविष्काराचे धडे शिकवीत अखंड कलेची साधना करीत आहात. आपल्यातील कलेचे आणि ज्ञानदानाचे कार्य खरोखरच कौतुकास्पद आहे.

आपल्या कलाक्षेत्रातील या स्पृहणीय कार्याचा गौरव करताना यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या सावित्रीबाई फुले अध्यासनाला विशेष आनंद होत आहे. आपल्या कार्यासाठी आपणाला हे सन्मानपत्र प्रदान करण्यात येत आहे. आपले हे नृत्यकला ज्ञानादानाचे कार्य आणि कलेचा प्रसार यापुढेही असाच अविरत सुरू राहावा यासाठी आपणाला अनेकानेक शुभेच्छा...!

डॉ. चेतना कामळस्कर, प्रमुख, सावित्रीबाई फुले अध्यासन
प्रा. डॉ. प्रकाश देशमुख, कुलसचिव
प्रा. डॉ. पी. जी. पाटील, कुलगुरू








**सन्मानानंतरची मा. विद्या देशपांडे यांची प्रतिक्रिया -** इतर क्षेत्रे ही गरजेची क्षेत्रे असतात. परंतु कला ही गरज संपल्यानंतर सुरु होते. कला जोपासताना अनेक अडचणी आल्या असे न मानता त्यात मला आनंदच अधिक होता. हा सन्मान म्हणजे प्रकाश घरी घेऊन जाणार आहे.

व्यासपीठावरील मान्यवरांच्या उपस्थितीत **डॉ. मृदुला बेळे - शैक्षणिक क्षेत्र (प्राध्यापक, एन.डी.एम.व्ही.पी. फार्मसी कॉलेज (आय.पी. आर. तज्ज्ञ / पेटंट कन्सल्टंट)** यांना सन्मानपत्र, शाल, मानचिन्ह, पुस्तक आणि पेरूचे रोप देऊन सन्मानित करतानाचा क्षण....


सर्वोत्कृष्ट संस्थेसाठी कॉमनवेल्थ ऑफ लर्निंगच्या आंतरराष्ट्रीय गुणवत्ता पुरस्काराने दोन वेळा सन्मानित
मनुष्यबळ विकास मंत्रालय, नवी दिल्ली यांचे 'स्वच्छ कॅम्पस रँकिंग २०१९' मानांकन प्राप्त
यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक
(नॅक मानांकित 'अ' श्रेणी)

सावित्रीबाई फुले अध्यासन

ती ज्ञानाची जननी, ती प्रेमाची मूर्ती ।
ती त्यागाची महती, ती सेवेची कर्ती ।।
होऊ कशी उतराई, तुझी आजन्म मी ऋणी ।।।

क्रांतिज्योती सावित्रीबाईंनी स्त्री-शिक्षणापासून सुरुवात करून स्वत:ला वेगवेगळ्या समाजकार्यात झोकून दिले. समाजसेवा हे सांगण्याचे कार्य नसून ते अव्याहत आणि निर्मोहीपणे करण्याचे कार्य आहे. हा परिपाठ सावित्रीबाईंनी त्यांच्या समर्पणातून दाखवून दिला.

।। कृतज्ञता सोहळा ।।

सन्मानपत्र

डॉ. मृदुला बेळे - अध्यापिका, लेखिका

आपण औषधनिर्माणशास्त्र या क्षेत्रात विद्या वाचस्पती ही पदवी संपादन केली आहे. आपली शिक्षणाची जिज्ञासा आणि आपल्या व्यवसायाची गरज लक्षात घेऊन आपण इटलीच्या विद्यापीठातून विधी शाखेतील पदव्युत्तर पदवीही (Intellectual Property) संपादन केली आहे. या शिक्षणक्रमासाठी आपणाला WIPO या आंतरराष्ट्रीय संस्थेकडून शिष्यवृत्ती प्राप्त झाली. व्यवसायाने आपण औषधशास्त्रज्ञ असूनही एक उत्तम प्राध्यापिका आहात. औषधनिर्माण शास्त्राव्यतिरिक्त इतरही वेगवेगळ्या विषयांचे अध्यापन करीत आहात. आपण अनेक शोध निबंधांचे लिखाण केले असून आंतरराष्ट्रीय जरनल्समध्ये यांचा समावेश झाला आहे. याद्वारे आपण जागतिक स्तरावरदेखील आपले आणि देशाचे नाव उज्वल केले आहे. लोकसत्ता या साप्ताहिक पुरवणीतील 'कथा अकलेच्या कांद्याची' या आपल्या स्तंभलेखनाचे पुस्तकात रूपांतर केले. 'करोनाच्या कृष्णछायेत' आणि 'अशी ही एक झुंज' ही आपली आणखी दोन पुस्तके करोनाच्या काळात प्रकाशित झाली आणि आपल्या या दोन पुस्तकांना महाराष्ट्र शासनाचा पुरस्कारही प्राप्त झाला. आपले कार्य प्रभावशाली असून प्रेरणादायी आहे.

आपल्या लिखाणाचा आणि अध्यापनाचा गौरव करताना यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या सावित्रीबाई फुले अध्यासनाला विशेष आनंद होत आहे. आपल्या या प्रशंसनीय कार्यासाठी आपणाला हे सन्मानपत्र प्रदान करण्यात येत आहे. यापुढील काळातही आपल्याकडून असेच लिखाण अविरत सुरू राहून भरीव साहित्य निर्माण व्हावे यासाठी आपणाला अनेकानेक शुभेच्छा !

| | | |
|---|---|---|
| डॉ. चेतना कामळस्कर<br>प्रमुख, सावित्रीबाई फुले अध्यासन | प्रा. डॉ. प्रकाश देशमुख<br>कुलसचिव | प्रा. डॉ. पी. जी. पाटील<br>कुलगुरू |








**सन्मानानंतरची मा. मृदुला बेळे यांची प्रतिक्रिया -** इतर क्षेत्रांतील व्यक्तींची सेवापूर्ती होत असते. त्यांची सेवापूर्ती झाल्यानंतर त्या व्यक्तींची पहिली ओळख कालांतराने तितकी रहात नाही. शिक्षकाचे काम जरी Thankless असले तरी सेवापूर्तीनंतरही विद्यार्थी शिक्षकांना कायम लक्षात ठेवतात. ह्या सन्माचा आनंद असा की, इतर सन्मानासाठी किंवा पुरस्कारांसाठी अर्ज करून त्यानंतर योग्यता तपासून पुरस्कार दिला जातो. पण इथे अर्ज न करता मिळल्याचा जास्त आनंद वाटतो.

व्यासपीठावरील मान्यवरांच्या उपस्थितीत **श्रीमती अपूर्वा जाखडी - विज्ञान क्षेत्र (खगोल संशोधक, नाशिक)** यांना सन्मानपत्र, शाल, मानचिन्हे, पुस्तक आणि पेरूचे रोप देऊन सन्मानित करतानाचा क्षण....



सर्वोत्कृष्ट संस्थेसाठी कॉमनवेल्थ ऑफ लर्निंगच्या आंतरराष्ट्रीय गुणवत्ता पुरस्काराने दोन वेळा सन्मानित
मनुष्यबळ विकास मंत्रालय, नवी दिल्ली यांचे 'स्वच्छ कॅम्पस रँकिंग २०१९' मानांकन प्राप्त

**यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक**

(नॅक मानांकित 'अ' श्रेणी)

**सावित्रीबाई फुले अध्यासन**

ती ज्ञानाची जननी, ती प्रेमाची मूर्ती ।
ती त्यागाची महती, ती सेवेची कर्ती ।।
होऊ कशी उतराई, तुझी आजन्म मी ऋणी ।।।

क्रांतिज्योती सावित्रीबाईंनी स्त्री–शिक्षणापासून सुरुवात करून स्वत:ला वेगवेगळ्या समाजकार्यात झोकून दिले. समाजसेवा हे सांगण्याचे कार्य नसून ते अव्याहत आणि निर्मोहीपणे करण्याचे कार्य आहे. हा परिपाठ सावित्रीबाईंनी त्यांच्या समर्पणातून दाखवून दिला.

**।। कृतज्ञता सोहळा ।।**

**सन्मानपत्र**

**अपूर्वा जाखडी – खगोल संशोधक, प्रशिक्षक**

पृथ्वीवर माणूस उपराच ! पण माणूस का उपरा ? या प्रश्नाची उकल उत्सुकतेने अंतराळ संशोधन केल्याशिवाय होऊच शकत नाही. हे जाणूनच आपण अंतराळ संशोधन हा मार्ग निवडलात. कल्पना चावला या आपल्या आदर्शाच्या वाटेवर चालताना अंतराळवीर सुनीता विल्यम्स यांचीही आपण प्रत्यक्ष भेट घेतली आहे. स्वत:भोवतीचा परीघ सोडून आपण आपला परीघ जागतिक पातळीपर्यंत विस्तीर्ण केला. पृथ्वी हा ब्रह्मांडाचा एक भाग आहे, ह्या कल्पनेचा पाठपुरावा आपण आपल्या संशोधन आणि अभ्यासाने करत आहात. खगोल संशोधन हे महिलांचे त्यामानाने कमी सहभाग असलेले क्षेत्र. मात्र आपण हे अनोखे क्षेत्र निवडले. नाशिक ते नासा असा आपला अनोखा प्रवास आहे. आपल्या या अनोख्या क्षेत्रात आपण स्वत:तर काम करीत आहातच आणि या क्षेत्रात नाशिकमधल्या दुर्गम भागातल्या मुलांमध्ये जिज्ञासा निर्माण करून त्यांनी या क्षेत्रात आपले ज्ञान वृद्धिंगत करावे, यासाठी प्रयत्नशील आहात. आपले हे योगदान अतिशय मोलाचे आहे.

आपल्या या अनोख्या क्षेत्रातील कार्याचा गौरव करताना यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या सावित्रीबाई फुले अध्यासनाला विशेष आनंद होत आहे. आपल्या या प्रशंसनीय कार्यासाठी आपणाला हे सन्मानपत्र प्रदान करण्यात येत आहे. यापुढील काळातही आपले कार्य अविरत सुरू राहावे यासाठी आपणाला अनेकानेक शुभेच्छा !

| | | |
|---|---|---|
| डॉ. चेतना कामळस्कर<br>प्रमुख, सावित्रीबाई फुले अध्यासन | प्रा. डॉ. प्रकाश देशमुख<br>कुलसचिव | प्रा. डॉ. पी. जी. पाटील<br>कुलगुरू |








**सन्मानानंतरची मा. अपूर्वा जाखडी यांची प्रतिक्रिया** - नाशिक ते नासा हा प्रवास अद्भूत होता. खगोल क्षेत्रात विज्ञान, गणित, अभियांत्रिकी या स्टेम एज्युकेशन बरोबर अवकाश तंत्रज्ञान पण आहेच, याला रॉकेट सायन्स म्हटल जातं आणि त्यातील 'Reaching to unreached' ही संकल्पना विद्यापीठाच्या संकल्पनेशी मिळतीजुळती आहे. या माध्यमातून खेड्यातल्या मुला-मुलींमध्ये जिज्ञासा वाढवून या क्षेत्राकडे वळवता येईल. या सन्मानामुळे अजून काम करण्याची आणि एकत्र काम करण्याची प्रेरणा मिळाली.

व्यासपीठावरील  मान्यवरांच्या उपस्थितीत **श्रीमती गायत्री कुलकर्णी - पत्रकारिता क्षेत्र (पत्रकार, महाराष्ट्र टाईम्स, नाशिक)** यांना सन्मानपत्र, शाल, मानचिन्ह, पुस्तक आणि पेरूचे रोप देऊन सन्मानित करतानाचा क्षण....


सर्वोत्कृष्ट संस्थेसाठी कॉमनवेल्थ ऑफ लर्निंगच्या आंतरराष्ट्रीय गुणवत्ता पुरस्काराने दोन वेळा सन्मानित
मनुष्यबळ विकास मंत्रालय, नवी दिल्ली यांचे 'स्वच्छ कॅम्पस रँकिंग २०१९' मानांकन प्राप्त
यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक
(नॅक मानांकित 'अ' श्रेणी)

सावित्रीबाई फुले अध्यासन

ती ज्ञानाची जननी, ती प्रेमाची मूर्ती ।
ती त्यागाची महती, ती सेवेची कर्ती ।।
होऊ कशी उतराई, तुझी आजन्म मी ऋणी ।।।

क्रांतिज्योती सावित्रीबाईंनी स्त्री-शिक्षणापासून सुरुवात करून स्वत:ला वेगवेगळ्या समाजकार्यात झोकून दिले. समाजसेवा हे सांगण्याचे कार्य नसून ते अव्याहत आणि निर्मोहीपणे करण्याचे कार्य आहे. हा परिपाठ सावित्रीबाईंनी त्यांच्या समर्पणातून दाखवून दिला.

।। कृतज्ञता सोहळा ।।

सन्मानपत्र

श्रीमती गायत्री कुलकर्णी - पत्रकार

आपण पत्रकारिता हे धाडसाचे क्षेत्र निवडलेत. पत्रकार हा समाजाचा आरसा. पत्रकारिता म्हणजे लोकशाहीचा चौथा स्तंभ. आपण हा स्तंभ बनून आपल्या प्रभावी लेखणीच्या जोरावर सामाजिक प्रश्नांना वाचा फोडण्याचे महत्त्वपूर्ण कार्य करीत आहात. शिक्षण क्षेत्रातील प्रश्न जसे शाळांमधील मुलींची घटती संख्या, यावर समग्र लेखन करून याबाबत जनजागृती करण्याचे भरीव कार्य करीत आहात. आपला हा प्रवास समाजासाठी प्रेरणादायी आहे. पत्रकारितेच्या माध्यमातून सर्वसामान्यांचे प्रश्न, महिलांचे भावविश्व व शैक्षणिक समस्या अशा अनेक बाबींवर समर्पक लेखन करून आपण समाजाला खऱ्या अर्थाने दिशा देण्याचे कार्य अविरत करीत आहात.

आपल्या पत्रकारिता क्षेत्रातील अतुलनीय योगदानाबद्दल आपला गौरव करताना यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या सावित्रीबाई फुले अध्यासनाला विशेष आनंद होत आहे. आपल्या या प्रशंसनीय कार्यासाठी आपणाला हे सन्मानपत्र प्रदान करण्यात येत आहे. यापुढील काळातही आपण समाजातील प्रश्न आपल्या माध्यमातून जनतेसमोर आणून या प्रश्नांचे निराकरण करावे यासाठी आपणाला अनेकानेक शुभेच्छा !

डॉ. चेतना कामळस्कर
प्रमुख, सावित्रीबाई फुले अध्यासन

प्रा. डॉ. प्रकाश देशमुख
कुलसचिव

प्रा. डॉ. पी. जी. पाटील
कुलगुरू









**सन्मानानंतरची मा. गायत्री कुलकर्णी यांची प्रतिक्रिया -** आपण करत असलेल्या क्षेत्रात आपण By Choice आलो आहोत. आपण करत असलेले काम हे आपले कर्तव्य आहे. परंतु विद्यापीठाने त्याची दखल घेऊन सन्मान केला त्याबद्दल त्यांचे आभार. सत्कार समारंभ हे एक एकत्र येण्याचे औचित्य आहे. आमच्या कार्याचे विद्यापीठाच्या कार्यात योगदान झाल्यास त्याचा जास्त आनंद होईल.

व्यासपीठावरील मान्यवरांच्या उपस्थितीत **सौ. गोदावरी पवार - सामाजिक क्षेत्र (स्वच्छता कर्मचारी, मनपा नाशिक)** यांना सन्मानपत्र, शाल, मानचिन्ह, पुस्तक आणि पेरूचे रोप देऊन सन्मानित करतानाचा क्षण....



सर्वोत्कृष्ट संस्थेसाठी कॉमनवेल्थ ऑफ लर्निंगच्या आंतरराष्ट्रीय गुणवत्ता पुरस्काराने दोन वेळा सन्मानित
मनुष्यबळ विकास मंत्रालय, नवी दिल्ली यांचे 'स्वच्छ कॅम्पस रँकिंग २०१९' मानांकन प्राप्त

**यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक**

(नॅक मानांकित 'अ' श्रेणी)

**सावित्रीबाई फुले अध्यासन**

ती ज्ञानाची जननी, ती प्रेमाची मूर्ती ।
ती त्यागाची महती, ती सेवेची कर्ती ।।
होऊ कशी उतराई, तुझी आजन्म मी ऋणी ।।।

क्रांतिज्योती सावित्रीबाईंनी स्त्री-शिक्षणापासून सुरुवात करून स्वत:ला वेगवेगळ्या समाजकार्यात झोकून दिले. समाजसेवा हे सांगण्याचे कार्य नसून ते अव्याहत आणि निर्मोहीपणे करण्याचे कार्य आहे. हा परिपाठ सावित्रीबाईंनी त्यांच्या समर्पणातून दाखवून दिला.

**।। कृतज्ञता सोहळा ।।**

**सन्मानपत्र**

गोदावरी पवार – स्वच्छता व सफाई

स्वच्छता व सफाई हे आरोग्यदायी जीवनाचे अविभाज्य घटक आहेत. स्वच्छतेमुळे रोगराईवर आळा बसतो. स्वत:ची तसेच स्वत:च्या घराची स्वच्छता याचे महत्त्व जनतेला असते. परंतु सामाजिक स्वच्छतेबद्दल तितकी जागरूकता दिसत नाही. सामाजिक ठिकाणाच्या अस्वच्छतेमुळे बरेच साथीचे रोग पसरले जातात. करोनाच्या काळात तर सामाजिक स्वच्छतेचे महत्त्व प्रकर्षाने जाणवले. कोणतेही काम हे कमी दर्जाचे नसते. कामाची प्रतिष्ठा आणि महत्त्व काम करणाऱ्यामुळे उंचावते. आपले काम हे आपले कर्तव्य आहे हे जाणून रुग्णालयात स्वच्छतादूत बनून कार्य करत आहात. आपल्या कार्यामुळे करोनाच्या प्रसारास आळा बसला. आपण करीत असलेल्या अथक सेवेबद्दल आणि समर्पित वचनबद्धतेबद्दल आपल्याला विनम्र अभिवादन.

आपल्या सेवाव्रती कार्याचा गौरव करताना यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या सावित्रीबाई फुले अध्यासनाला विशेष आनंद होत आहे. आपले कर्तव्य आपण यापुढेही अविरत सुरू ठेवावे यासाठी आपणाला अनेकानेक शुभेच्छा.

डॉ. चेतना कामळस्कर
प्रमुख, सावित्रीबाई फुले अध्यासन

प्रा. डॉ. प्रकाश देशमुख
कुलसचिव


प्रा. डॉ. पी. जी. पाटील
कुलगुरू







व्यासपीठावरील मान्यवरांच्या उपस्थितीत **डॉ. विद्या सुर्वे-बोरसे - साहित्य क्षेत्र (सरपंच, लेखिका, प्राध्यापक, पंचवटी महाविद्यालय, नाशिक)** यांना सन्मानपत्र, शाल, मानचिन्ह, पुस्तक आणि पेरूचे रोप देऊन सन्मानित करतानाचा क्षण....



सर्वोत्कृष्ट संस्थेसाठी कॉमनवेल्थ ऑफ लर्निंगच्या आंतरराष्ट्रीय गुणवत्ता पुरस्काराने दोन वेळा सन्मानित
मनुष्यबळ विकास मंत्रालय, नवी दिल्ली यांचे 'स्वच्छ कॅम्पस रँकिंग २०१९' मानांकन प्राप्त

**यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक**

(नॅक मानांकित 'अ' श्रेणी)

**सावित्रीबाई फुले अध्यासन**

ती ज्ञानाची जननी, ती प्रेमाची मूर्ती ।
ती त्यागाची महती, ती सेवेची कर्ती ।।
होऊ कशी उतराई, तुझी आजन्म मी ऋणी ।।।

क्रांतिज्योती सावित्रीबाईंनी स्त्री-शिक्षणापासून सुरुवात करून स्वत:ला वेगवेगळ्या समाजकार्यात झोकून दिले. समाजसेवा हे सांगण्याचे कार्य नसून ते अव्याहत आणि निर्मोहीपणे करण्याचे कार्य आहे. हा परिपाठ सावित्रीबाईंनी त्यांच्या समर्पणातून दाखवून दिला.

**।। कृतज्ञता सोहळा ।।**

**सन्मानपत्र**

**डॉ. विद्या सुर्वे-बोरसे, सरपंच, लेखिका, प्राध्यापिका**

आपण सरपंच पदाची धुरा यशस्वी सांभाळून एक यशस्वी सरपंच म्हणून धुळे जिल्ह्यात नावलौकिक प्राप्त केला. सरपंच परिषदेतही आपण सहभाग घेतला. सध्या आपण मराठी विभागाच्या विभागप्रमुख म्हणून कार्यरत आहात. मात्र केवळ अध्यापनाचेच कार्य न करता आपण बालसाहित्यातही रममाण झालात. बालमनांच्या भावविश्वात डोकावताना आपण 'बालसाहित्य : आकलन आणि समीक्षा' हा समीक्षाग्रंथ प्रकाशित केला. या समीक्षाग्रंथाला राज्य शासनाचे पुरस्कारही मिळाले. आपण विविध आंतरराष्ट्रीय तसेच राष्ट्रीय चर्चासत्रांमध्ये अध्यक्ष, निमंत्रित म्हणून आपण आपले बहुमूल्य योगदान दिले. विविध शोधनिबंधांचे वाचन केले. विविध नियतकालिके, मासिके, दिवाळी अंक यांमधून लेखन केले. 'आईना' या टोपणनावाने आपण कविता लेखन करतात. ब्रेख्तच्या कवितांचा आपण अनुवादही केलात. आदर्श सरपंच, प्राध्यापक, लेखक, अनुवादक हा आपला प्रवास समाजासाठी अतिशय प्रेरणादायी आहे. आपल्या साहित्यातून आपण दीपस्तंभासारखा मार्ग दाखवाल यात शंका नाही.

आपल्या साहित्य क्षेत्रातील अतुलनीय कार्यकर्तृत्वाचा गौरव करताना यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या सावित्रीबाई फुले अध्यासनाला विशेष आनंद होत आहे. आपल्या या प्रशंसनीय कार्यासाठी आपणाला हे सन्मानपत्र प्रदान करण्यात येत आहे. यापुढील काळातही आपणाकडून विविध विषयांवर लिखाण व्हावे व उत्तम साहित्य निर्माण व्हावे यासाठी आपणाला अनेकानेक शुभेच्छा !

डॉ. चेतना कामळस्कर
प्रमुख, सावित्रीबाई फुले अध्यासन

प्रा. डॉ. प्रकाश देशमुख
कुलसचिव

प्रा. डॉ. पी. जी. पाटील
कुलगुरू








**सन्मानानंतरची मा. डॉ. विद्या सुर्वे-बोरसे यांची प्रतिक्रिया** - ज्या ज्या महान विभुती होऊन गेल्या त्यांच्या कार्याची/कामाची दखल किंवा गौरव ते निघून गेल्यानंतर होतो. परंतु आपला सन्मान हा आपल्याला इतक्या चांगल्या संस्थेकडून आताच प्राप्त झालाय हयाचा खूप आनंद झालाय. सन्मानाने जबाबदारी वाढलीय व त्याचे भान ठेवून स्वत:लाच वचन देते.

व्यासपीठावरील मान्यवरांच्या उपस्थितीत **सौ. विजया देठे - वैद्यकीय क्षेत्र (नर्स, झाकीर हुसेन हॉस्पिटल, नाशिक)** यांना सन्मानपत्र, शाल, मानचिन्ह, पुस्तक आणि पेरूचे रोप देऊन सन्मानित करतानाचा क्षण....



सर्वोत्कृष्ट संस्थेसाठी कॉमनवेल्थ ऑफ लर्निंगच्या आंतरराष्ट्रीय गुणवत्ता पुरस्काराने दोन वेळा सन्मानित
मनुष्यबळ विकास मंत्रालय, नवी दिल्ली यांचे 'स्वच्छ कॅम्पस रँकिंग २०१९' मानांकन प्राप्त

**यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक**

(नॅक मानांकित 'अ' श्रेणी)

**सावित्रीबाई फुले अध्यासन**

ती ज्ञानाची जननी, ती प्रेमाची मूर्ती ।
ती त्यागाची महती, ती सेवेची कर्ती ।।
होऊ कशी उतराई, तुझी आजन्म मी ऋणी ।।।

क्रांतिज्योती सावित्रीबाईंनी स्त्री–शिक्षणापासून सुरुवात करून स्वत:ला वेगवेगळ्या समाजकार्यात झोकून दिले. समाजसेवा हे सांगण्याचे कार्य नसून ते अव्याहत आणि निर्मोहीपणे करण्याचे कार्य आहे. हा परिपाठ सावित्रीबाईंनी त्यांच्या समर्पणातून दाखवून दिला.

**।। कृतज्ञता सोहळा ।।**

**सन्मानपत्र**

विजया देठे – नर्स –सिस्टर

सिस्टर म्हणजे बहिण. सावित्रीबाईंनी ज्याप्रमाणे प्लेगच्या साथीत आपल्या जिवाची पर्वा न करता रुग्णसेवा केली. तद्वतच रुग्णसेवा हीच ईश्वरसेवा मानून रुग्णसेवेच्या कार्यात स्वत:ला झोकून दिले. करोनाच्या काळात आपण आपल्या जिवाची पर्वा न करता अव्याहतपणे आणि आपुलकीने करोना रुग्णांची सेवा केलीत. आपल्या प्रशंसनीय, अथक सेवेची आणि समर्पित वचनबद्धतेची आम्ही प्रशंसा करतो. आपल्या सेवाभावी कार्यासाठी आपल्याला विनम्र अभिवादन!

आपल्या सेवाव्रती कार्याचा गौरव करताना यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या सावित्रीबाई फुले अध्यासनाला विशेष आनंद होत आहे. आपल्या कार्यासाठी आपणाला हे सन्मानपत्र प्रदान करण्यात येत आहे. आपले हे रुग्णसेवेचे कार्य यापुढेही असेच अविरत सुरू राहावे यासाठी आपणास अनेकानेक शुभेच्छा !

| | | |
|---|---|---|
| डॉ. चेतना कामळस्कर<br>प्रमुख, सावित्रीबाई फुले अध्यासन | प्रा. डॉ. प्रकाश देशमुख<br>कुलसचिव | प्रा. डॉ. पी. जी. पाटील<br>कुलगुरू |








**सन्मानानंतरची मा. विजया देठे यांची प्रतिक्रिया -** सध्या झाकीर हुसेन हॉस्पिटलमध्ये सेवा करत आहे. त्यापूर्वी पुण्याच्या केईएम हॉस्पिटलमध्ये कार्यरत होते. माझ्या कामाची दखल घेऊन मला हा पुरस्कार प्रदान केला त्याबद्दल धन्यवाद.

व्यासपीठावरील मान्यवरांच्या उपस्थितीत **श्यामला चव्हाण - कृषी क्षेत्र (ग्रामविकास चळवळीतील सामाजिक कार्य, नाशिक)** यांना सन्मानपत्र, शाल, मानचिन्ह, पुस्तक आणि पेरूचे रोप देऊन सन्मानित करतानाचा क्षण....



सर्वोत्कृष्ट संस्थेसाठी कॉमनवेल्थ ऑफ लर्निंगच्या आंतरराष्ट्रीय गुणवत्ता पुरस्काराने दोन वेळा सन्मानित
मनुष्यबळ विकास मंत्रालय, नवी दिल्ली यांचे 'स्वच्छ कॅम्पस रँकिंग २०१९' मानांकन प्राप्त

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

(नॅक मानांकित 'अ' श्रेणी)

सावित्रीबाई फुले अध्यासन

ती ज्ञानाची जननी, ती प्रेमाची मूर्ती ।
ती त्यागाची महती, ती सेवेची कर्ती ।।
होऊ कशी उतराई, तुझी आजन्म मी ऋणी ।।।

क्रांतिज्योती सावित्रीबाईंनी स्त्री-शिक्षणापासून सुरुवात करून स्वत:ला वेगवेगळ्या समाजकार्यात झोकून दिले. समाजसेवा हे सांगण्याचे कार्य नसून ते अव्याहत आणि निर्मोहीपणे करण्याचे कार्य आहे. हा परिपाठ सावित्रीबाईंनी त्यांच्या समर्पणातून दाखवून दिला.

।। कृतज्ञता सोहळा ।।

सन्मानपत्र

श्रीमती श्यामला चव्हाण - सामाजिक कार्यकर्त्या - ग्रामविकास चळवळ

'साधी राहणी आणि उच्च विचारसरणी' असे आपले व्यक्तिमत्त्व. महात्मा गांधीजींच्या 'खेड्याकडे चला' या विचारांनी प्रेरित होऊन खरोखर आपण आपले कार्य खेड्यांच्या सर्वांगीण विकासासाठी समर्पित करीत आहात. या सामाजिक कार्याचे बाळकडू आपण आपल्या वडिलांकडून लहानपणापासून अट्टाहासाने घेतले. खरंतर आपली घडण सेवादलाच्या शिबिरांमधून झाली. त्यामुळेच आपण 'गरिबांचं शिक्षण' प्रमाण मानून कष्टकरी वस्तीतल्या शालाबाह्य मुलांना शिक्षणाच्या प्रवाहात आणलतं. समाजसेवेच्या क्षेत्रातलं आवश्यक वैधानिक मास्टर ऑफ सोशल वर्कचे शिक्षण घेऊन रस्त्यावरची मुलं ते आदिवासी, कर्करोग रुग्णालयापासून ते आदिवासी गावे दत्तक घेऊन आदिवासींचे शिक्षण, आरोग्य, रोजगार, हे प्रश्न सुधारित शेती, बचतगटांच्या माध्यमातून सोडवत आहात. नुसतं धान्य पिकवून भागणार नाही हे जाणून बाजारपेठेची नवनवी तंत्रज्ञान वापरून पिकवलेल्या शेतमालाचं ब्रँडिंग करून बाजारपेठ मिळवून देत आहात. हे एक प्रकारचं शिक्षणच आहे. या आपल्या उपक्रमामुळे कोविडच्या लॉकडाऊनच्या काळात या आदिवासींच्या शेतमालाला चांगली मागणी लाभली. आपल्या या कार्यामुळे सहा आदिवासी गावे आत्मनिर्भर होण्याच्या मार्गावर आहेत. खेडेगावातील बालविवाह प्रथा आणि स्त्री-भ्रूणहत्या यांबाबत जगजागृती करून सावित्रीबाईंचा आदर्शही आपण सातत्याने पुढे नेत आहात.

आपल्या या ग्रामविकास चळवळीतील सेवाभावी वृत्तीचा आणि कार्याचा गौरव करताना यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या सावित्रीबाई फुले अध्यासनाला विशेष आनंद होत आहे. आपल्या या प्रशंसनीय कार्यासाठी आपणाला हे सन्मानपत्र प्रदान करण्यात येत आहे. यापुढील काळातही आपले कार्य अविरत सुरू राहावे यासाठी आपणाला अनेकानेक शुभेच्छा !

डॉ. चेतना कामळस्कर
प्रमुख, सावित्रीबाई फुले अध्यासन

प्रा. डॉ. प्रकाश देशमुख
कुलसचिव

प्रा. डॉ. पी. जी. पाटील
कुलगुरू








**सन्मानानंतरची मा. श्यामला चव्हाण यांची प्रतिक्रिया -** सन्मान घेण्याला संकोच होतो. पण ह्या सन्मानामुळे आमचे कार्य या निमित्ताने आपणापुढे आणता आले. कष्टकरी वर्गाच प्रतिनिधित्व मी करते आहे. हा सन्मान आमच्या सर्व कष्टकरी वर्गाचा आहे. मला खूप समाधान वाटत आहे.

व्यासपीठावरील मान्यवरांच्या उपस्थितीत **सौ. आश्विनी देवरे - क्रीडाक्षेत्र (सुवर्ण कन्या, पोलिस खाते, नाशिक शहर)** यांना सन्मानपत्र, शाल, मानचिन्ह, पुस्तक आणि पेरूचे रोप देऊन सन्मानित करतानाचा क्षण....



सर्वोत्कृष्ट संस्थेसाठी कॉमनवेल्थ ऑफ लर्निंगच्या आंतरराष्ट्रीय गुणवत्ता पुरस्काराने दोन वेळा सन्मानित
मनुष्यबळ विकास मंत्रालय, नवी दिल्ली यांचे 'स्वच्छ कॅम्पस रँकिंग २०१९' मानांकन प्राप्त

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

(नॅक मानांकित 'अ' श्रेणी)

सावित्रीबाई फुले अध्यासन

ती ज्ञानाची जननी, ती प्रेमाची मूर्ती ।
ती त्यागाची महती, ती सेवेची कर्ती ।।
होऊ कशी उतराई, तुझी आजन्म मी ऋणी ।।।

क्रांतिज्योती सावित्रीबाईंनी स्त्री-शिक्षणापासून सुरुवात करून स्वत:ला वेगवेगळ्या समाजकार्यात झोकून दिले. समाजसेवा हे सांगण्याचे कार्य नसून ते अव्याहत आणि निर्मोहीपणे करण्याचे कार्य आहे. हा परिपाठ सावित्रीबाईंनी त्यांच्या समर्पणातून दाखवून दिला.

।। कृतज्ञता सोहळा ।।

सन्मानपत्र

अश्विनी देवरे – पोलिस खात्यातील सुवर्णकन्या

अत्यंत प्रतिकूल वातावरण. एखादी प्रतिकूल गोष्ट साध्य करावयाची असेल तर प्रवाहाच्या विरुद्ध जाण्याचे धाडस दाखवावेच लागते, असे विचार सावित्रीबाईंनी मुलींना शिक्षण देताना स्वत:च्या आचरणातून दर्शवून दिले. मुलगी म्हणजे काचेचं भांड तिला बाहेर काढायचं नाही अशा खुळचट विचारसरणीतून मार्ग काढत अत्यंत खडतर आर्थिक परिस्थितीवर मात करीत आपण मॅरेथॉन व अन्य क्रीडाप्रकारांत सुवर्णपदकांसह अनेक पदकांना गवसणी घातली. आपल्या आक्रमक विचारसरणीद्वारे आपण ग्रामीण भागातल्या मुलींमध्ये त्यांना त्यांचे स्वत्व गवसण्याचं बळ देत सावित्रीबाईंनी दर्शवलेल्या पदपथावरून मार्गक्रमण करण्यास उद्युक्त करीत आहात. शिक्षणाने प्रगती साध्य होते हे विचार रुजवत आहात. आपल्याला पोलीस खात्याने दिलेलं 'सुवर्ण कन्या' हे बिरुद आपण सार्थ ठरवलत. आपण खरोखरच आव्हानांना पुरून उरणाऱ्या आयर्नवुमन आहात.

आपल्या क्रीडाक्षेत्रातील कार्याचा गौरव करताना यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या सावित्रीबाई फुले अध्यासनाला विशेष आनंद होत आहे. आपल्या कार्यासाठी आपणाला हे सन्मानपत्र प्रदान करण्यात येत आहे. आपण यापुढेही विविध क्रीडा प्रकारांत आपले नैपुण्य दाखवत उत्तुंग भरारी घ्यावी आणि देशाचे नाव उज्वल करावे यासाठी आपणाला अनेकानेक शुभेच्छा.

| | | |
|---|---|---|
| डॉ. चेतना कामळस्कर<br>प्रमुख, सावित्रीबाई फुले अध्यासन | प्रा. डॉ. प्रकाश देशमुख<br>कुलसचिव | प्रा. डॉ. पी. जी. पाटील<br>कुलगुरू |







**सन्मानानंतरची मा. अश्विनी देवरे यांची प्रतिक्रिया** - आयर्नमॅन म्हणजे लोहपुरुष. हा किताब मिळविण्यासाठी खूप खडतर परिश्रम घ्यावे लागतात. परंतु जरी खडतर असले तरी महिलेने का करू नये ? असा विचार करून परिश्रमांना सुरुवात केली. कुठलेही यश मिळवायचे असेल तर कुणाकडूनही काही अपेक्षा करू नये. प्रामाणिक व सातत्यपूर्ण परिश्रमाला यश येतेच. सावित्रीबाई फुले अध्यासनाने माझा सन्मान केलात मला खूप समाधान वाटत आहे.

# सावित्रीबाई फुले अध्यासन

या ‘कृतज्ञता सोहळा’कार्यक्रमाची छायाचित्रे.....



मान्यवर आणि सन्मानार्थी यांचे आगमन....



क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण व दीप प्रज्वलन करताना ॲड. दीपाली खेडकर मॅडम...



क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण व दीप प्रज्वलनकरतांना मा. लीना बनसोड मॅडम...



क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण व दीप प्रज्वलन करतांना मा. कुलसचिव डॉ. प्रकाश देशमुख...



व्यवस्थापन मंडळाचे सदस्य डॉ. जयदीप निकम यांचे स्वागत करताना डॉ. चेतना कामळस्कर



मा. कुलसचिव डॉ. प्रकाश देशमुख यांचे स्वागत करताना डॉ. चेतना कामळस्कर



सूत्रसंचालन करताना सौ. माधुरी खर्जुल...



कृतज्ञता सोहळाचा उद्देश प्रास्ताविकातून मांडताना डॉ. चेतना कामळस्कर...



प्रमुख पाहुण्या ॲड. दीपाली खेडकर यांचा परिचय करून देतांना श्री प्रमोद पवार



सन्मानार्थींच्या सन्मानपत्राचे वाचन करतांना सौ. माधुरी देशपांडे ...



शिक्षणाच्या माध्यमातून सामाजिक प्रगती साध्य करण्यास सावित्रीबाई फुले यांच्या कार्यास चालना द्यावी असा संदेश डॉ. जयदीप निकम यांनी मनोगतातून दिला.



उपस्थितांना मार्गदर्शन करतांना निमंत्रित पाहुण्या ॲड. दीपाली खेडकर



कृतज्ञता सोहळाच्या कार्यक्रमास उपस्थित प्राध्यापक, अधिकारी, कर्मचारी व इतर



सावित्रीबाई फुले अध्यासनाचे कार्य अधिकाधिक समाजाभिमुख करण्यासाठी आणि संवाद दृढ होण्यासाठी नवनवीन उपक्रम राबिवले जातील अशी माहिती कुलसचिव डॉ. प्रकाश देशमुख यांनी कृतज्ञता सोहळाच्या निमित्ताने बोलताना दिली



उपस्थितांचे आभार व्यक्त करतांना श्री. दत्ता पाटील...

## सावित्रीबाई फुले अध्यासन कार्यकारी सदस्य

या कार्यक्रमासाठी पुढील सदस्यांनी विविध जबाबदारी सांभाळत हा कार्यक्रम योग्यरीतीने पुढे नेला :

- डॉ .चेतना कामळस्कर -अध्यासनप्रमुख
- श्री .प्रमोद शंकर पवार - अध्यासनसमन्वयक
- सौ .कविता देव -सदस्य
- सौ. माधुरी देशपांडे -सदस्य
- सौ. अंजली ताजनपुरे - (शिंदे)सदस्य
- सौ. भावना भऊरकर -सदस्य
- डॉ .दयाराम पवार -सदस्य
- श्री .दत्ता पाटील -सदस्य
- श्री. दयानंद हत्तीअंबिरे -सदस्य
- श्री .सचिन शिंदे -सदस्य
- सौ. माधुरी खर्जुल –आमंत्रित सदस्य
- स्वरांजली जाधव -मदतनीस

# या कार्यक्रमासाठी उपस्थित असलेले श्रोता मान्यवर

सावित्रीबाई फुले अभ्यासिका
Daily vages Attendence
"कृतज्ञता सोहळा"
18/10/22
मंगळवार

| Sr No | Name | Contact | Sign |
|---|---|---|---|
| ① | Swapanjali milind Jadhav. | 7498406640. | |
| ② | Archana Shivaji Pawar | 7218845294 | |
| ③ | Rupali Somnath Tinkal | 8975760952 | |
| ④ | Manish kailas pawle | 8788635399 | |
| ⑤ | Shilshankar Dhakar | 9359915408 | |
| ⑥ | Vaibhav Namdev Kafdale | 9699506982 | Kafdale |
| ⑦ | Akshay Bhanudas Bodkhe | 9834483615 | |
| ⑧ | Ashish Namdev Kapgate | 9959987585 | |
| ⑨ | Sanjay Manohar Gavali. | 7498629980 | |
| ⑩ | Pradnya Shivdas Donde | 7304144012 | |
| ⑪ | Jyoti swapnil Gangurde | 9960005151 | Gangurde |
| ⑫ | Sayali Sanjay Gaikwad | 9145770413 | |
| ⑬ | Yudee Nitin Deware | 7038205501 | |
| ⑭ | Gayatri P. landge | 7849075982 | G.P.landge. |
| ⑮ | Pallavi chaudhari | | |
| ⑯ | Kanchan. kasar. | 9762174960 | Kasar. |
| ⑪ | Pratik Nikam | 9370470222 | Patik |
| 12) | Kartik Gade | 7798912914 | Kgade |
| 13) | Ramakant Meshram | 8668497242 | |
| 14) | Ganesh Kamble | 9763126466 | GKamble |
| 15 | Sanket Unhale | 7773852869 | Sanket |
| 16 | Nitin .M. Jadhav | | |
| 17) | Chaitali Gangurde | 7387912947 | |
| 18 | Namrata s Khade | 9021991621 | |
| 19 | Kalyani more | 9579909648 | Khade |
| 20) | Soneli Mohite | 7507062912 | |
| 21 | Anju Suryawanshi | 9527046014 | |
| 22) | Ashwini Jagtap | 9370578098 | |
| | Tanvi Pawar | 8767253071 | |

| Sr. No. | Name | Contact | |
|---|---|---|---|
| 1) | Chandni Bhaskol | 797214114 | |
| 2) | Savita Ranwade | 8010608286 | |
| 3) | Komal Jondhale | 8637783929 | |
| 4) | Vasave Varsha | 8459882066 | |
| 5) | Manisha Kharpade | 8805990772 | |
| 6) | Sandhya Sonawane | 9075527633 | |
| 7) | Sujata Suryawanshi | 784192018 | |
| 8) | Varsha Gujar | 7741067264 | |
| 9) | Dhumal Shubhangini | 8857837308 | |
| 10) | Savita Jadhav | 9766172135 | |
| 11) | Shital Patil | 801010675 | |
| 12 | Mangal Tidame | 7020396127 | |
| 13 | Nutan Salve | 8888896728 | |
| 14 | Viki Dhawale | 8669054234 | |
| 15] | Shweta kathe | 9028005842 | |

"सावित्रीबाई फुले प्रव्यासन
Non Academic Attendence
"कृतज्ञता सोहळा"

18/10/2022
मंगळवार

| Sr. No | Name | Contact | Sign. |
|---|---|---|---|
| 1 | Prajakta sunil sonone | 9356284156 | |
| 2 | Gaikwad Dipali Sukhadev | 7058767036 | |
| 3 | Rupali Suryawanshi | 8308180593 | |
| 4) | Sradha Nirbhane | 777392088 | |
| 5) | Komal Barbade | 9421894713 | |
| 6) | Sneha Sonawane | 7620499065 | |
| 7) | Priyanka Pradhan | 7066613516 | |

"कृतज्ञता सोहळा" Attendence Sheet

| S R. | NAME OF ATTENDY | CONTACT | SIGN |
|---|---|---|---|
| ① | Dr. Nusrat Shaikh | 8669494564 | |
| ② | Dr. Shagin Shaikh | 8329815194 | |
| ③ | Kailas More | 8888846244 | |
| ④ | Dr. Sonare. S. S. | 9552033892 | |
| ⑤ | Dr. Sanjay T. Kharat | 7776878287 | |
| 6) | Dr. Sunil Gawande | 9767704250 | |
| 7) | Rishi Raj Nelawar | 9768272902 | |
| 8 | Jadhav P V | 9766471409 | |
| 9. | Kohale Nilesh V | 8390611360 | |
| 10 | Renuka chavan | 8830237400 | |
| 11. | Ranjita Rathor | 9168274682 | |
| 12 | ज्योत्स्ना पाटील | 7507774690 | |
| 13 | Vilas M. Badhan | 9403774681 | |
| 14. | Vijay Chavan | 9403774674 | |
| 15. | Dandas Jadhav | 9422245168 | |
| 16. | Dr. Sneha Rathod | | |
| 17. | Jyoti Patil | | |
| 18. | Pradeep Ohol | | |
| 19. | Ranjeet Akhre. | 9011519051 | |
| 20 | Shantaram Chavan | 9850255178 | |
| 21 | [illegible] | 9422267587 | |
| 22 | Dr. Archana Pandagale | 9689021369 | |
| 23 | Praveen Wagh | 7090465044 | |
| 24 | Dayanand Hatkambe | 8275688929 | |
| 25 | Shubhangi N Patil | 8275088644 | |
| 26 | Mrs S. J. Kulkarni. | 9403774568 | |
| 27 | Mrs. J. P. Kamble | 9403774569 | |
| 28 | Mrs. Wadile Meena R. | 9422245682 | |
| 29 | Gadbole S. M. | 9403774690 | |
| 30 | Suryawanshi Pooja | 9403774718 | |
| 31 | M. M. Dco | 9403774526 | |
| 32 | Chorge. M. K. | 9403774552 | |
| 33 | Rajendra Wagh | | |
| 34 | Tejaswi Pawar | 9689261046 | |
| 35 | Vandana Fegade | 9403774595 | |
| 36 | Manisha Jadhav | 9833154051 | |
| 37 | Sanket Rawade | 9403774621 | |
| 38 | Sarika Shinde | 9403774722 | |
| 39 | Sandhya Sadawale | 9403774710 | |
| 40 | Vidya Londhe | 9422559967 | |
| 41 | Archana Deshmukh | 9403774698 | |
| 42 | Kamdi Hemlata | | |
| 43 | Shinde Radhika | | |
| 44 | Dr Dayaram Fulzele | | |

सकाळ

# महिला सबलीकरणासाठी संवाद गरजेचा

## दीपाली खेडकर : मुक्त विद्यापीठातर्फे महिला कृतज्ञता सोहळा



नाशिक : कृतज्ञता सोहळ्याप्रसंगी ॲड. दीपाली खेडकर, डॉ. प्रकाश देशमुख, डॉ. जयदीप निकम, डॉ. चेतना कामळस्कर आदी.

**नाशिक, ता. १९ :** महिलांसाठी काम करताना सर्वसमावेशकता, हेतूमधील स्पष्टता आणि सातत्य असल्यास तळागाळातील घटकांपर्यंत आपले कार्य झिरपत जाऊन एक सामाजिक संवाद प्रस्थापित होऊ शकतो, असे प्रतिपादन सामाजिक कार्यकर्त्या ॲड. दीपाली खेडकर यांनी येथे केले. यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या सावित्रीबाई फुले अध्यासनातर्फे नाशिकमधील विविध क्षेत्रात आपल्या कार्यातून ठसा उमटविणाऱ्या कर्तबगार महिलांचा गौरव करणारा कृतज्ञता सोहळा झाला. या वेळी त्या बोलत होत्या.

कुलसचिव डॉ. प्रकाश देशमुख, विद्यापीठाच्या व्यवस्थापकीय मंडळाचे सदस्य डॉ. जयदीप निकम व अध्यासन प्रमुख डॉ. चेतना कामळस्कर यांच्या हस्ते महिलांना गौरविण्यात आले. गौरवण्यात आलेल्यांची नावे अशी : प्रशासकीय- आदिवासी विकास महामंडळाच्या व्यवस्थापकीय संचालक लीना बनसोड, कला आणि संस्कृतिक विद्या देशपांडे, शैक्षणिक डॉ. मृदुला बेळे, क्रीडा अश्विनी देवरे, विज्ञान अपूर्वा जाखडी, पत्रकारिता गायत्री कुलकर्णी, सामाजिक गोदावरी पवार, साहित्य डॉ. विद्या सुर्वे- बोरसे, वैद्यकीय पारिचारिका विजया देठे, ग्रामविकास श्यामला चव्हाण, पोलिस निरीक्षक सारिका अहिरराव. कोरोनामुळे आपले जीवनसाथी गमावलेल्या सुमारे सहाशे निराधार गरीब महिलांना विविध रोजगाराचे प्रशिक्षण देवून त्यांना स्वयंपूर्ण करताना क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांचा आदर्श डोळ्यापुढे होता आणि म्हणूनच हे कार्य करता आले, असेही ॲड. खेडकर यांनी स्पष्ट केले. डॉ. देशमुख यांनी सावित्रीबाई फुले अध्यासनाचे कार्य हे अधिकाधिक समाजाभिमुख होण्यासाठी आणि हा संवाद दृढ होण्यासाठी मुक्त विद्यापीठातर्फे नवनवीन उपक्रम राबविले जातील, अशी ग्वाही दिली. डॉ. कामळस्कर यांनी प्रास्ताविक केले. सत्कार सोहळ्याच्या माध्यमातून नवी प्रेरणा घेऊन जात असल्याचे बनसोड यांनी स्पष्ट केले. माधुरी खर्जुल व प्रमोद पवार सूत्रसंचालन केले. माधुरी देशपांडे यांनी मानपत्राचे वाचन केले. कार्यक्रमाचे संयोजन कविता देव, भावना बहुलकर, अंजली ताजनपुरे यांनी केले.

Nashik, Nashik-Today
20/10/2022 Page No. 4

# महिला सबलीकरणासाठी संवाद गरजेचा

### ॲड. दीपाली खेडकर यांचे प्रतिपादन

म. टा. प्रतिनिधी, नाशिक



समाजातील महिला वर्गासाठी काम करताना सर्वसमावेशकता, हेतूंमधील स्पष्टता आणि सातत्य असल्यास तळागाळातील घटकांपर्यंत आपले कार्य झिरपत जाऊन एक सामाजिक संवाद प्रस्थापित होऊ शकतो, असे प्रतिपादन सामाजिक कार्यकर्त्या ॲड. दीपाली खेडकर यांनी केले.

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या सावित्रीबाई फुले अध्यासनातर्फे नाशिकमधील विविध क्षेत्रातील महिलांच्या कृतज्ञता सोहळा झाला. यावेळी प्रमुख पाहुण्या म्हणून त्या बोलत होत्या. कुलसचिव डॉ. प्रकाश देशमुख, विद्यापीठाच्या व्यवस्थापकीय मंडळाचे सदस्य डॉ. जयदीप निकम व अध्यासन प्रमुख डॉ. चेतना कामळस्कर यांच्या हस्ते अकरा महिलांना सन्मानपत्र व स्मृतिचिन्ह देऊन गौरविण्यात आले.

शिक्षणाच्या माध्यमातून होणारी क्रांती हीच सामाजिक उत्थानाचा सर्वांत प्रभावी मार्ग असल्याचे प्रतिपादन डॉ. निकम यांनी केले. अध्यासनाचे कार्य आणि हेतू याबाबत डॉ. कामळस्कर यांनी माहिती दिली. माधुरी खर्जुल व प्रमोद पवार यांनी सूत्रसंचालन केले. माधुरी देशपांडे यांनी मानपत्रांचे वाचन केले. कविता देव, भावना बहुलकर, अंजली ताजनपुरे यांनी कार्यक्रमाचे संयोजन केले. यावेळी विद्यापीठाचे जनसंपर्क अधिकारी दत्त पाटील, नाट्य दिग्दर्शक सचिन शिंदे आदी उपस्थित होते.

### ...यांचा झाला सन्मान

आदिवासी विकास महामंडळाच्या व्यवस्थापकीय संचालक लीना बनसोड (प्रशासकीय), अश्विनी देवरे (क्रीडा), विद्या देशपांडे (कला, सांस्कृतिक), डॉ. मृदुला बेळे (शैक्षणिक), अपूर्वा जाखडी (विज्ञान), गायत्री कुलकर्णी (पत्रकारिता), स्वच्छता कर्मचारी गोदावरी पवार (सामाजिक), डॉ. विद्या सुर्वे-बोरसे (साहित्य), परिचारिका विजया देठे (वैद्यकीय), ग्रामविकास चळवळीतील कार्यकर्त्या श्यामला चव्हाण आणि पोलिस निरीक्षक सारिका अहिरराव यांचा सन्मान करण्यात आला.

पुण्य नगरी



# महिला सबलीकरणासाठी सामाजिक संवाद गरजेचा : दीपाली खेडकर

**नाशिक :** समाजातील महिला वर्गासाठी काम करताना हेतूंमधील स्पष्टता सर्वसमावेशकता, आणि सातत्य असल्यास तळागाळातील घटकांपर्यंत आपले कार्य झिरपत जाऊन एक सामाजिक संवाद प्रस्थापित होऊ शकतो, असे प्रतिपादन सामाजिक कार्यकर्त्या ॲड. दीपाली खेडकर यांनी केले.

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या सावित्रीबाई फुले अध्यासनाच्या वतीने नाशिकमधील विविध क्षेत्रात आपल्या कार्यातून ठसा उमटविणाऱ्या कर्तबगार महिलांचा गौरव करणारा कृतज्ञता सोहळा पार पडला. त्याप्रसंगी प्रमुख पाहुण्या म्हणून ॲड. खेडकर बोलत होत्या.

कुलसचिव डॉ. प्रकाश देशमुख, विद्यापीठाच्या व्यवस्थापकीय मंडळाचे सदस्य डॉ. जयदीप निकम व अध्यासन प्रमुख डॉ. चेतना कामळस्कर यांच्या हस्ते महिलांना गौरविण्यात आले. या कार्यक्रमात प्रशासकीय क्षेत्रात आदिवासी विकास महामंडळाच्या व्यवस्थापकीय संचालक लीना बनसोड, कला आणि संस्कृतिक क्षेत्रात विद्या देशपांडे, शैक्षणिक क्षेत्रात डॉ. मृदुला बेळे, क्रीडा क्षेत्रात अश्विनी देवरे, विज्ञान क्षेत्रात अपूर्वा जाखडी, पत्रकारितेत गायत्री कुलकर्णी, सामाजिक क्षेत्रात स्वच्छता कर्मचारी गोदावरी पवार, साहित्य क्षेत्रात डॉ. विद्या सुर्वे - बोरसे, वैद्यकीय क्षेत्रात परिचारिका विजया देठे, ग्रामविकास चळवळीतील कार्यकर्त्या श्यामला चव्हाण, पोलीस निरीक्षक सारिका अहिरराव यांना सन्मानपत्र व स्मृतीचिन्ह देऊन सन्मानित करण्यात आले. कोरोनामुळे आपले जीवनसाथी गमावलेल्या सुमारे सहाशे निराधार गरीब महिलांना विविध रोजगाराचे प्रशिक्षण देवून त्यांना स्वयंपूर्ण करताना क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांचा आदर्शडोळ्यापुढे होता आणि म्हणूनच हे कार्य करता आले, असेही ॲड. खेडकर म्हणाल्या. डॉ. देशमुख यांनी सावित्रीबाई फुले अध्यासनाचे कार्य हे अधिकाधिक समाजाभिमुख होण्यासाठी आणि हा संवाद दृढ होण्यासाठी मुक्त विद्यापीठातर्फे नवनवीन उपक्रम राबविले जातील, अशी ग्वाही दिली. डॉ. निकम यांनी शिक्षणाच्या माध्यमातून होणारी क्रांती हीच सामाजिक उत्थानाचा सर्वात प्रभावी मार्ग असल्याचे प्रतिपादित केले. यावेळी सर्व सत्कारार्थींनी मनोगत व्यक्त केले. डॉ. कामळस्कर यांनी प्रास्ताविकात अध्यासनाचे कार्य आणि हेतूंबद्दल माहिती दिली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन माधुरी खर्जुल व प्रमोद पवार यांनी केले. माधुरी देशपांडे यांनी मानपत्रांचे वाचन केले. कार्यक्रमाचे संयोजन कविता देव, भावना बहुलकर, अंजली ताजनपुरे यांनी केले.

Smart Nashik Edition
Oct 21, 2022 Page No. 4
Powered by : eReleGo.com

## पुण्य नगरी

# मुक्त विद्यापीठातर्फे उद्या कर्तबगार महिलांचा सत्कार

नाशिक : यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या सावित्रीबाई फुले अध्यासनाच्या वतीने नाशिकमधील विविध क्षेत्रात आपल्या कार्यातून ठसा उमटविणाऱ्या कर्तबगार महिलांचा गौरव करणारा कृतज्ञता सोहळा उद्या मंगळवार दिनांक १८ ऑक्टोबर २०२२ रोजी विद्यापीठाच्या शैक्षणिक सभागृहात सकाळी ११ वाजता होणार असल्याची माहिती कुलसचिव डॉ. प्रकाश देशमुख व अध्यासन प्रमुख डॉ. चेतना कामळस्कर यांनी दिली. सामाजिक कार्यकर्त्या ॲड. दीपाली खेडकर यांच्या प्रमुख उपस्थितीत होणाऱ्या या कार्यक्रमात प्रशासकीय क्षेत्रात आदिवासी विकास महामंडळाच्या व्यवस्थापकीय संचालक लीना बनसोड, कला आणि सांस्कृतिक क्षेत्रात विद्या देशपांडे, शैक्षणिक क्षेत्रात डॉ. मृदुला बेळे, क्रीडा क्षेत्रात अश्विनी देवरे, विज्ञान क्षेत्रात अपूर्वा जाखडी, पत्रकारितेत गायत्री कुलकर्णी, सामाजिक क्षेत्रात स्वच्छता कर्मचारी गोदावरी पवार, साहित्य क्षेत्रात डॉ. विद्या सुर्वे - बोरसे, वैद्यकीय क्षेत्रात पारिचारिका विजया देठे, ग्रामविकास चळवळीतील कार्यकर्त्या श्यामला चव्हाण, पोलिस निरीक्षक सारिका अहिरराव या महिलांचा सन्मान होणार आहे.

Smart Nashik Edition
Oct 18, 2022 Page No. 2
Powered by : eReleGo.com

## पुढारी

प्रचंड खपाचे एकमेव नि:पक्ष व निर्भीड दैनिक
स्थापना १९३९
www.pudhari.com



नाशिक : यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ सावित्रीबाई फुले अध्यासनाच्या कृतज्ञता सोहळ्यातील पुरस्कारार्थींसमवेत मान्यवर.

# महिला सबलीकरणासाठी सामाजिक संवाद गरजेचा

### ॲड. खेडकर : फुले अध्यासनातर्फे महिलांचा सन्मान

**नाशिक : पुढारी वृत्तसेवा**

समाजातील महिला वर्गासाठी काम करताना सर्वसमावेशकता, हेतूंमधील स्पष्टता आणि सातत्य असल्यास तळागाळातील घटकांपर्यंत कार्य झिरपत जाऊन एक सामाजिक संवाद प्रस्थापित होऊ शकतो. महिला सबलीकरणासाठी सामाजिक संवाद गरजेचा असल्याचे प्रतिपादन सामाजिक कार्यकर्त्या ॲड. दीपाली खेडकर यांनी केले.

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या सावित्रीबाई फुले अध्यासनाच्या वतीने नाशिकमधील विविध क्षेत्रांत ठसा उमटविणाऱ्या कर्तबगार महिलांच्या कृतज्ञता सोहळ्यात त्या बोलत होत्या. व्यासपीठावर कुलसचिव डॉ. प्रकाश देशमुख, विद्यापीठाच्या व्यवस्थापकीय मंडळाचे सदस्य डॉ. जयदीप निकम व अध्यासन प्रमुख डॉ. चेतना कामळस्कर आदी उपस्थित होते. कोरोनामुळे जीवनसाथी गमावलेल्या सुमारे ६०० निराधार गरीब महिलांना विविध रोजगाराचे प्रशिक्षण देऊन त्यांना स्वयंपूर्ण करताना क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांचा आदर्श डोळ्यापुढे होता आणि म्हणूनच हे कार्य करता आले, असे ॲड. खेडकर यांनी सांगितले. तर अध्यासनाचे कार्य हे अधिकाधिक समाजाभिमुख होण्यासाठी मुक्त विद्यापीठातर्फे नवनवीन उपक्रम राबविले जातील, अशी ग्वाही कुलसचिव डॉ. देशमुख यांनी दिली. दरम्यान, माधुरी खर्जुल व प्रमोद पवार यांनी सूत्रसंचालन केले. माधुरी देशपांडे यांनी मानपत्रांचे वाचन केले. कविता देव, भावना बहुलकर, अंजली ताजनपुरे आदींनी कार्यक्रमाचे संयोजन केले.

#### यांचा झाला सन्मान

आदिवासी विकास महामंडळाच्या व्यवस्थापकीय संचालक लीना बनसोड, कला आणि सांस्कृतिक क्षेत्रात विद्या देशपांडे, शैक्षणिक क्षेत्रात डॉ. मृदुला बेळे, क्रीडा क्षेत्रात अश्विनी देवरे, विज्ञान क्षेत्रात अपूर्वा जाखडी, पत्रकारितेत गायत्री कुलकर्णी, सामाजिक क्षेत्रात स्वच्छता कर्मचारी गोदावरी पवार, साहित्य क्षेत्रात डॉ. विद्या सुर्वे-बोरसे, पारिचारिका विजया देठे, ग्रामविकास चळवळीतील श्यामला चव्हाण, पोलिस निरीक्षक सारिका अहिरराव.

My Nashik Edition
Oct 21, 2022 Page No. 4
newspaper.pudhari.co.in